# शिक्षण आमच्या हक्काचं! नाही कुणाच्या मर्जीचं!!
# शिक्षणाचं बाजारीकरण बंद करा!

मानव संसाधन व विकास मंत्रालयाने २० मार्च २०१८ रोजी भारतीय उच्च शिक्षण आयोग विधेयक २०१८ आणले आहे. यानुसार ६२ शैक्षणिक संस्थांना व विद्यापीठांना 'संपूर्ण स्वायत्तता' देण्याचा निर्णय घेतला आहे. यात बीएचयू, अलीगढ विद्यापीठ, हैदराबाद केंद्रीय विश्वविद्यालय, जेएनयू, बरोबर ५ सेंट्रल युनिव्हर्सिटी आणि २१ राज्यस्तरीय विद्यापीठे सामील आहेत. त्याचबरोबर आता सरकारने विद्यापीठांना अनुदान देणारी यूजीसी (UGC) ही संस्था रद्द करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा 'हायर एज्युकेशन कमिशन'च्या स्थापनेसाठी हालचाल सुरू केली आहे.

वरवर पाहता स्वायत्तता हा शब्द खूपच चांगला वाटतो. ज्यामुळे या शैक्षणिक संस्था स्वतःच्या परीक्षा घेऊ शकतील, स्वतःच्या प्रवेश प्रक्रिया राबवू शकतील, शैक्षणिक अभ्यासक्रम ठरवू शकतील. ह्याला शैक्षणिक स्वायत्तता म्हणतात आणि याआधी देखील संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता होती. पण अशा संस्थांना लागणारा पैसा सरकार पुरवत होतं. मग आता या स्वायत्ततेचा काय अर्थ? आत्ता केलेली घोषणा ही केवळ शैक्षणिक स्वायत्तता न ठेवता ती आर्थिक स्वायत्तता देखील करण्यात येणार आहे. ह्याचा अर्थ असा की कोणत्या अभ्यासक्रमासाठी किती फी आकारण्यात यावी, किती शिक्षक नेमावे, कोणत्या शिक्षकांना किती पगारावर ठेवण्यात यावे, कुठे खर्च करावा, कुठे कपात करावी इ. आर्थिक बाबी देखील या संस्था स्वतःहून ठरवतील.

म्हणजेच हळूहळू शैक्षणिक संस्थांना सरकारी अनुदान मिळणे बंद होणार आहे. त्याचा परिणाम म्हणून ह्या संस्थांना स्वतःचा पैसा उभा करावा लागेल. अर्थातच याचा बोजा विद्यार्थ्यांवर टाकला जाईल, फी वाढेल आणि एखाद्या खाजगी कॉलेजाप्रमाणे केवळ पैसा असणाऱ्यांनाच अशा संस्थांमध्ये प्रवेश मिळेल. अर्थिक स्वायत्तता जाहीर करून सरकार गरिबांना शिक्षणाचा अधिकार नाकारत आहे आणि शिक्षणाच्या जबाबदारीतून आपला काढता पाय घेत आहे हे यावरून स्पष्ट होते. ह्यापुढे शिक्षण ही केवळ श्रीमंतांची मक्तेदारी होईल. संपूर्ण स्वायत्ततेचं हे धोरण शिक्षणातील कॉर्पोरेट संस्कृती व खाजगी कंपन्यांना शिक्षणक्षेत्र आंदण देण्याची नांदी आहे.

सरकारचे हे पाऊल पूर्णतः संविधानविरोधी आहे. विद्यापीठ अनुदान आयोग बरखास्त करून नवीन आयोगाच्या माध्यमातून सरकार आयोगाचे सर्व अधिकार केंद्रीत करणार आहे. आधीच कमकुवत असलेल्या शिक्षण व्यवस्थेला आणखी लुळे करण्याचा हा प्रयत्न आहे.

## शिक्षणाची सद्यस्थिती

- आजही ४.२७ कोटी मुलं शाळेची पायरी चढलेले नाहीत.
- ४०% मुलं ८वी पर्यंत शाळा सोडतात.
- ५.५ कोटी मुलं आजही बालमजूर आहेत.
- ९०,००० हून अधिक शाळांमध्ये फळासुद्धा नाही.
- १ लाखाहून अधिक शाळांमध्ये फक्त १ वर्गखोली आहे.
- ६०% शाळांमध्ये १ किंवा २ शिक्षक आहेत.

## ही स्वायत्तता गरिबांच्या मुळावर?

याचाच अर्थ ७० टक्क्यापेक्षा जास्त मुले पदवी शिक्षणापर्यंत पोहोचतच नाहीत. ही मुले अर्थातच गरीब, उपेक्षित, वंचित, अल्पसंख्याक, आदिवासी आणि मागासवर्गीय घटकांतील; तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागांतील आहेत. या मुलांमध्येही मुलींचे प्रमाण अधिक आहे. एकेका रुपयाने महाग होणारे शिक्षण समाजाच्या या 'नाही रे' घटकाला त्यापासून दूर नेत आहे आणि गरिबीच्याच खाईत लोटत आहे. देशातील साठ विद्यापीठे आणि महाविद्यालये यांना स्वायत्तता देण्याच्या केंद्राच्या निर्णयाकडे या पार्श्वभूमीतून पाहण्याची मोठी गरज आहे.

शिक्षणाची इतकी भयंकर अवस्था असताना शिक्षणावरील खर्च गेल्या ४ वर्षात ३३% ने कमी केला आहे. एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या सहा टक्के रक्कम शिक्षणासाठी ठेवण्याच्या कोठारी आयोगाच्या शिफारशीला केव्हाच केराची टोपली दाखविण्यात आली आहे. जो काही तीन-साडेतीन टक्के खर्च केला जातो, तोही कमी होत आहे.

## सरकार खरंच गरीब आहे का?

गेल्या चार वर्षात सरकारने अतिश्रीमंतांना दिलेली सूट:

- कर माफी अंदाजे २२ लाख कोटी
- कर्जमाफी अंदाजे ३ लाख कोटी

याशिवाय सरकार धनदांडग्यांना मोठमोठ्या प्रोजेक्टस मध्ये प्रोत्साहनाच्या नावाखाली लाखो कोटी रुपये अनुदान देत असते. या देशात १.१० लाख कोटींची बुलेट ट्रेन येणे महत्त्वाचे आहे, पण ४.२३ कोटी मुलामुलींच्या शिक्षणासाठी सरकारकडे पैसे नाहीत. सर्वसामान्य जनतेवर मूलभूत गरजांसाठी होणारा खर्च आणि कल्याणकारी योजनांसाठी सरकार नेहमीच पैसे नसल्याचं सोंग घेते. आफ्रिकेतील अनेक गरीब देश देखील शिक्षण आणि आरोग्यावर भारताच्या तुलनेत जास्त खर्च करतात. दोस्तहो, शिक्षण ही प्रत्येक माणसाच्या, समाजाच्या, देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण बाब आहे. त्यात नफा-तोटा हा विचार करणेच चुकीचे आहे.

## शिक्षणाच्या बाजारीकरणाविरुद्ध लढा

शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे सरकारचे ब्रिद असायला हवे. सध्या या क्षेत्रात अगदी प्राथमिक स्तरापासून व्यापारीकरण मोठ्या वेगाने झाले आहे. शिक्षणासारख्या गोष्टीचा अशा प्रकारे व्यापार होऊ देणे इष्ट नाही. या पार्श्वभूमीवर स्वायत्तता म्हणजे 'तुमचा खर्च तुम्हीच भागवा,' असा होतो. तसे झाल्यास आधीच महाग असलेले उच्च शिक्षण आणखी महागण्याची शक्यता आहे. परिणामी 'नाही रे' वर्गातील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून आणखी दूर जाण्याचा धोका आहे. खासगी महाविद्यालयांत प्राध्यापकांचे होत असलेले आर्थिक शोषण आणखी वाढण्याचाही धोका आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात सध्याच पैसेवाल्यांची मक्तेदारी निर्माण झाली असून, ती अधिक दृढ होईल. पूर्ण स्वायत्ततेचा अर्थच हा की शिक्षण आता फक्त पैसेवाल्यांसाठी राखीव आहे. असंख्य विद्यार्थ्यांना क्षमता असूनही पैशांअभावी चांगले शिक्षण मिळू शकत नाही. दुसरीकडे चांगल्या शिक्षणसंस्थांमधील जागा श्रीमंत घरातील विद्यार्थ्यांनी क्षमता नसताना अडवून ठेवल्याचे दिसते.

शिक्षणाच्या या मूलभूत अधिकारासाठी आपण सर्वांनी एकत्र यायला लागेल. हे सर्व का घडतंय हे समजून घ्यायला लागेल. १९९१ साली स्विकारलेल्या जागतिक बँकेच्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या अटींनुसार सरकारी सेवांवरील खर्च कमी करून त्यांचे खाजगीकरण करण्याची अट भारताने स्विकारलेली आहे. त्यामुळेच अन्न, शिक्षण, आरोग्य, पाणी अशा अत्यावश्यक सेवा धनदांडग्यांना पैसा कमावण्यासाठी देऊन टाकल्या जात आहेत. शिक्षण क्षेत्रातील कंपनीकरण हादेखील याच धोरणाचा भाग आहे. आपल्या देशातील शिक्षणविषयक धोरणे कुणी शिक्षणतज्ज्ञ सांगत नाहीत, तर अंबानी–बिर्ला सारखे भांडवलदार सांगतात. २००० साली बिर्ला–अंबानी समितीने शिक्षणाच्या व्यापारीकरणासाठीचा अहवाल सरकारला सादर करून उच्च शिक्षणाच्या जबाबदारीतून मुक्त व्हायला सांगितले आणि त्यानंतर उच्च शिक्षणाची अवस्था काय झालीये आपण पाहत आहोत. त्याचेच एक पुढचे पाऊल म्हणजे संपूर्ण स्वायत्तता. दोस्तहो, याविरोधात आजच्या तरुण पिढीने आवाज बुलंद करणे अत्यावश्यक आहे. चला तर, लोकांना जागृत करूया, संघटित करूया, आणि शिक्षणाचा धंदा हाणून पाडूया.

## लोकायत


**संपर्क पत्ता:** लोकायत, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – ४

*(या पत्त्यावर दर रविवारी संध्या. ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची बैठक होते. बैठकीत आपलं स्वागत आहे.)*

अलका – 9067003838 ऋषिकेश – 9423507864 www.lokayat.org.in lokayat.india@gmail.com

lokayat.india lokayat.india @lokayat lokayatpune abhivyakti.pune KafilaOfficial



हे पत्रक अलका जोशी यांनी लोकायतसाठी गुरुवार, दि. २६ जुलै २०१८ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.